


साप्ताहिक
www.dongarcharaja.com
वडवणी तालुक्यातील पहिले मराठी वृत्तपत्र
# डोंगरचा राजा




■ वर्ष १० ■ अंक ९ ■ बुधवार, दि. ११ सप्टेंबर २०२४ ■ RNI No. : MAHMAR/2015/62614 ■ पोस्टल परवाना : L. SB/Beed/RNP-219/2024-2026 ■ email:dongarcharaja@gmail.com ■ पाने ४ ■ किंमत १ रु.



# अब आयें..ऊंट पहाड के नीचे..!

## इच्छुक उमेदवारांची धांदल उडाली; दौऱ्याच्या बॅनरवरुन पक्षश्रेष्ठींना वगळले

**डोंगरचा राजा विशेष वृत्त..**

**माजलगाव विधानसभा मतदारसंघांमध्ये निवडणूक लढण्यासाठी गाव भेटीगाठी वर भर दिला जात असून कोणत्या पक्षाकडून कोणाला उमेदवारी मिळणार हे निश्चित होत नसल्याने इच्छुक असलेल्या सर्वांमध्ये दमछाक झाली आहे. दुसरीकडे मात्र मराठायोद्धा मनोज जरांगे पाटील यांचा आशीर्वाद ज्याला मिळेल तोच खरा धुमधडाकेबाज ठरणार आहे. म्हणूनच म्हणावेसे वाटते अब आयें..ऊंट पहाड के नीचे.!**













गेल्या वर्षभरापासून मराठा आरक्षणासाठी रात्रंदिवस सरकार प्रति अक्रोश निर्माण करणाऱ्या मराठायोद्धा मनोज जरांगे पाटील यांनी संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील मराठा समाज जागृत केला आहे. त्या माध्यमातून सरकारला मराठा आरक्षण लागू करण्यास भाग पाडण्याच्या प्रक्रिया अजूनही युद्ध पातळीवर सुरू असून दुसरीकडे मात्र विधानसभेच्या निवडणुकीचे चित्र समोर येऊन उभे ठाकले आहे. गत वेळी लोकसभा निवडणुकीच्या वेळी संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी आशीर्वाद दिलेल्या उमेदवारांनी विजयाची नोंद केली असून हे केवळ आणि केवळ मनोज जरांगे पाटील यांच्या एका हाकेला ओ.. देत तमाम मराठा बांधवांनी साथ दिली आहे. म्हणूनच गत लोकसभा निवडणुकीत विरोधकांची जी गत झाली ती पुन्हा विधानसभेत होणार नाही यासाठी आतापासूनच विधानसभेसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांनी संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांची मनधरणी करण्याचे काम हाती घेतले आहे. माजलगाव विधानसभा मतदारसंघांमध्ये मराठा ओबीसी मागासवर्गीय व इतर जातीचे इच्छुक उमेदवार निश्चितच मराठायोद्धा मनोज जरांगे पाटील यांचे आशीर्वाद घेण्यासाठी धडपडत असतानाचे चित्र दिसत आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीगाठी घेतल्यानंतर इच्छुक उमेदवार मतदार संघातील गावागावात जाऊन आपल्या निवडणूक लढण्याची मोर्चे बांधणी करू लागले आहेत. लोकसभा निवडणुकीत बीड जिल्ह्यामध्ये चित्र ओबीसी विरुद्ध मराठा असे होते. आणि त्यात मराठा समाजाने एकमेव मनोज जरांगे पाटील यांच्या आदेशाचे पालन केले. आता मात्र

माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे चित्र यावर्षीच्या विधानसभा निवडणुकीत अत्यंत वेगळे निर्माण झाले आहे. गत काही महिन्यात दोन जातीमध्ये संघर्ष पहावयास मिळाला होता. आता मात्र या माजलगाव विधानसभा मतदारसंघांमध्ये मराठा जातीमधील इच्छुक उमेदवारांची संख्या मोठ्या प्रमाणावर निर्माण झाले असून प्रमुख पक्षांकडे मराठा उमेदवारच आगेकूच करताना दिसत आहेत. मराठा उमेदवार गाव भेटीगाठीवर सुध्दा भर देत असले तरी ज्यांना कुणाला मनोज जरांगे पाटील यांचा आशीर्वाद मिळेल तोच उमेदवार यशस्वी होईल असे चित्र सध्या माजलगाव विधानसभा मतदारसंघांमध्ये पहावयास मिळत आहे. या मतदारसंघांमध्ये सध्याचे विद्यमान आमदार प्रकाश सोळंके,माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील, ज्येष्ठ नेते रमेश आडसकर,ज्येष्ठ नेते मोहनराव जगताप, जेष्ठ नेते नारायणराव डक, बहुजन नेते बाबुराव पोटभरे, युवा नेतृत्व जयसिंग सोळंके,युवा नेतृत्व बाबरी मुंडे, युवा नेतृत्व ईश्वर मुंडे, युवा नेतृत्व माधवराव निर्मळ,युवा नेतृत्व मंजुरभाई सह अनेक जण इच्छुक आहेत. सध्या माजलगाव विधानसभा मतदारसंघातील माजलगाव धारूर वडवणी या तीनही तालुक्यांमध्ये इच्छुक उमेदवार गावागावात वाड्यावर त्या तांड्यावर जाऊन आपल्या निवडणुकीसाठी मोर्चे बांधणी करताना दिसत आहेत काही इच्छुक उमेदवारांनी आपल्या दौऱ्याच्या बॅनरवर मात्र पक्षाचे वरिष्ठ नेते व त्यांचे पक्षाचे नाव टाकण्याचे टाळले असून केवळ स्वतःचे छायाचित्र आणि गाव वाड्या वस्त्या, तारीख किती, वेळ कितीचा हीच आकडेवारी प्रकर्षाने दिसून येत आहे. या गाव भेटीच्या अनुषंगाने गावातील नागरिक व तमाम मतदार मात्र द्विधा मनस्थितीत आहेत. भेटीगाटीसाठी येणारे इच्छुक उमेदवार कोणत्या पक्षाकडून लढणार हे स्पष्टपणे करत नसल्याने आपण नेमकी काय भूमिका घ्यावी याचा देखील मतदार विचार करू लागले आहेत. चित्र कोणतेही कसेही असो मात्र संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांचा आशीर्वाद ज्या उमेदवाराला मिळेल तोच खरा धूमधडाकेबाज ठरणार म्हणजे ठरणार हे निश्चित मानले जात आहे.

# गझलकार सतीश दराडे यांना राज्यभरातून श्रद्धांजली...!



डोंगरचा राजा विशेष..

बीड जिल्ह्यातील वडवणी च्या जवळ असलेल्या टोकेवाडी (खडकी देवळा) येथील सामान्य शेतकरी कुटुंबातील शिक्षकी पेशात असलेले सतीष दराडे सर यांचं दोन दिवसांपूर्वीच निधन झाल्याची वार्ता संपूर्ण राज्यभरात वाऱ्यासारखी पसरली. अचानक बातमी ऐकून अनेकांची मने सुन्न झाली, दुःख झाली. तसं मृत्यूची बातमी

ऐकली की कोणीही काही क्षणांसाठी दु:खी होते कारण मृत्यू शाश्वत, सत्य आहे. तो कोणालाही टाळता येत नाही. किंवा मृत्यू पासून कोणीही पळून जाऊ शकत नाही. मृत्यू होण्या अगोदर कसलीही कल्पना येत नाही मात्र जन्म होण्याच्या अगोदर नऊ महिन्यांपासून कल्पना असते. दराडे

सरांच्या बाबतीत सर्व उलटं झाले म्हणावे लागेल कारण की त्यांनी गझल च्या माध्यमातून मृत्यू वर खुप काही लिहिले आहे. त्यांनी कल्पना देखील केली नसेल की एक ना एक दिवस मृत्यू अटळ आहे. परंतु मरण्याने माझ्या जाण्याने काही फरक पडणार नाही.

ज्येष्ठ समाजसेवीका सिंधुताई सपकाळ यांनी म्हटले होते. मोठं होण्यासाठी मरावे लागते. त्याचीच प्रचीती म्हणजे दराडे सर

त्यांच्या निधनामुळे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ना. धनंजय मुंडे माजी मंत्री पंकजाताई मुंडे, खासदार सुप्रियाताई सुळे,आ प्रकाश सोळंके, जेष्ठ नेते मोहनराव जगताप, जेष्ठ नेते रमेशराव आडसकर,ज्येष्ठ पत्रकार विलास बडे यांच्यासारख्या अनेक मोठया मान्यवर मंडळींनी व मित्रपरिवारांनी सोशल मीडिया वरुन शोकसंदेश व्यक्त केला आहे. आपल्या शोकसंदेशात ते म्हणता

त आम्हाला कळले की आमचे दराडे सर किती मोठे होते. सर आपण देहाने जरी सोडून गेला असलात तरी आपल्या गझल च्या माध्यमातून आपण अमर आहात. मरावे परी किर्ती रुपी उरावे याप्रमाणे आपली किर्ती अमर राहील.

**Devendra Fadnavis**
48m ·
युवा गझलकार, कवि, लेखक सतीश दराडे यांचे अकाली निधन मनाला चटका लावणारे आहे. इतक्या लहान वयात ते आपल्याला सोडून जातील, अशी कल्पनाही केली नव्हती. शिक्षक म्हणून काम करतानाच अतिशय प्रगल्भ अशा गझल त्यांनी लिहिल्या आणि अल्पावधीतच देशभर ख्याती मिळविली. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबीयांच्या, आप्तांच्या दु:खात मी सहभागी आहे.
ॐ शांति🙏

**Mohan Jagtap**
3h ·
टोकेवाडी ता.वडवणी येथील शेतकरी कष्टकऱ्यांची वेदना टिपणारे गझल क्षेत्रात नावलौकिक करणारे गझलकार सतीश दराडे यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांच्या घरी सांत्वनपर भेट दिली. तसेच भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.
#mohanjagtap #majalgaon

**Ramesh Baburao Adaskar** is in **Majalgaon**.
AI info · 1m ·
बीड जिल्ह्यातील तरुण गझलकार सतीश दराडे यांचे निधन चटका लावणारे आहे. अतिशय सुंदर,संवेदनशील अशा रचना त्यांनी केल्या होत्या. त्यांच्या निधनामुळे मराठी गझलेचे मोठे नुकसान झाले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.
.ॐ शांती

**Dhananjay Munde**
AI info · 24m ·
'शब्दातले ठणकने डोळ्ययांमध्ये तरळते,
तेव्हाच वेदनेच्या हाती चुडा भरावा...'
या आणि अशा अनेक गझलींनी महाराष्ट्राला वे... See more

**Pankaja Gopinath Munde**
9h ·
बीड जिल्ह्यातील टोकवाडी सारख्या खेडेगावातून शिक्षण घेऊन शिक्षकी पेशा सांभाळत गझल क्षेत्रात मोठं नावलौकिक मिळविणारे नव्या पिढीचे अभिजात गझलकार ... See more

**Vilas Bade**
20h ·
रंग कर्जाने दिला शेतास आम्ही
देश मग टीव्हीवर हिरवागार झाला

आमची सुगी ऋतूंच्या गेली घशात सारी
तुमच्या बरे निघाले खुर्चीत पीक भाऊ

शेती मातीची वेदना, व्यवस्थेनं मांडलेला खेळ ज्यांनी आपल्या शब्दातून प्रखरपणे मांडला असे प्रतिभावंत गझलकार सतिश दराडे आपल्यातून गेले. आजच्या काळातला अस्सल मातीतला हा माणूस आपलं वैभव होता. ज्यांच्या शब्दांचा फॅन होतो. त्यांचं असं अचानक जाणं चटका लावणारं आहे. भावपूर्ण श्रद्धांजली मास्तर 🌼🌼🌼🙏

**Supriya Sule**
22h ·
नव्या पिढीतील गझलकार सतीश दराडे यांचे निधन चटका लावणारे आहे. अतिशय तरल, संवेदनशील अशा रचना त्यांनी केल्या होत्या. त्यांच्या निधनामुळे मराठी गझलेचे मोठे नुकसान झाले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**Prakash Solanke - प्रकाश...**
37m ·
निधनाची वार्ता आली आणि काळजाचा ठोका चुकला !

बीड जिल्ह्याच्या मातीतला,आपल्या मतदारसंघातील टोकेवाडी ता.वडवणी.गावातील तरुण सुप्रसिद्ध गझलकार सतीश दराडे यांच्या निधनाची वार्ता अत्यंत दु:खद आहे. महाराष्ट्राभर गझलकार म्हणून नावलौकीक मिळाले.पण नियतीने हा हिरा आपल्यापासून हिरावून घेतला. गझलच्या क्षेत्रामध्ये सतीश यांना सगळे द किलर दराडे म्हणायचे.सतिश दराडे यांच्या जाण्याने गझल पोरकी झाली.

मंदिराच्या जवळ हिंसाचार झाला..
देव नसतो आज साक्षात्कार झाला..

रंग कर्जाने दिला शेतास आम्ही..
देश मग टीव्हीत हिरवागार झाला..

आमची सुगी ऋतूंच्या गेली घशान सारी..
तुमच्या बरे निघाले खुर्चीत पिक भाऊ..

बांधावरी बसा अन्? एक एक थेंब मोजा..
पाऊस म्हणे पिकाला
देतोस का भिक भाऊ..



नुसत्याच अकलीवर
श्रीमंत कोण होतो..
पैशाशिवाय असतो मेंदू पडीक भाऊ..

तो भूतकाळ तोडु हा वर्तमान जोडू..
थोडे करू आता हे
आयुष्य ठिक व्हावे..

वेळेत वेळ काढून मी श्वास घेत आहे..
दररोज जीवनाला महसूल देत आहे..

– गझलकार सतीश दराडे

# संपादकीय

## काश्मीरी आखाडा

जम्मू- काश्मीरमध्ये १८ सप्टेंबर, २५ सप्टेंबर आणि १ ऑक्टोबर अशा तीन टप्प्यांत विधानसभा निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. निवडणुकीनंतर जनतेने निवडलेले सरकार श्रीनगरच्या तख्तावर स्थापन होईल. या निवडणुकीने लोकशाही प्रक्रियेला चालना मिळेल आणि राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल. जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभेच्या ९० जागांसाठी निवडणूक होत आहे. जम्मूमधील ४३ व काश्मीर खोऱ्यातील ४७ मतदारसंघांत मतदार आपला मतदानाचा हक्क बजावतील. काश्मीरमध्ये शांतता व विकासाचा नवा अध्याय सुरू करण्यासाठी विधानसभा निवडणूक हे प्रभावी माध्यम ठरावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. जम्मू-काश्मीरला दहशतवादापासून मुक्तता मिळावी आणि युवकांना त्यांचे उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी संधी प्राप्त व्हावी म्हणून या निवडणुकीकडे पाहिले जात आहे. आजवर झालेल्या विधानसभा निवडणुकींपेक्षा यंदाची निवडणूक अगदी वेगळी आहे. सर्वच राजकीय पक्षांत अनिश्चितता आणि असंमजसपणा आहे. या निवडणुकीत मतदार कोणाच्या बाजूने कौल देणार याची सर्वांना मोठी उत्सुकता आहे. नॅशनल कॉन्फरन्स, पीडीपी आणि काँग्रेस या तीन पक्षांत सहकार्य आणि संघर्ष अशी घालमेल चालू आहे. नॅशनल कॉन्फरन्स व काँग्रेसने विधानसभा निवडणुकीसाठी आघाडी करण्याची घोषणा केली आहे.

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि नॅशनल कॉन्फरन्सचे सर्वेसर्वा डॉ. फारूख अब्दुल्ला व माजी मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्या संयुक्त बैठकीनंतर दोन्ही पक्षांनी आघाडीची घोषणा केली. जरी ९० जागांवर आघाडी केल्याची या दोन पक्षांनी घोषणा केली असली तरी पहिल्या टप्प्यातील २४ जागांवर काँग्रेस व नॅशनल कॉन्फरन्स यांच्यात जागा वाटपात बरेच अडथळे आहेत. मेहबुबा मुफ्ती यांची पीपल्स डेमॉक्रॅटिक पार्टी या आघाडीपासून दूर आहे. पण त्यांचा व फारूख अब्दुल्ला यांच्या नॅशनल कॉन्फरन्सचा अजेंडा बराच सारखाच आहे. ३७० कलम संपुष्टात आल्यानंतर अब्दुल्ला पिता-पुत्र व मेहबुबा हे दोन्ही नेते व त्यांचा पक्ष केंद्र सरकारच्या विरोधात आक्रोश करीत आहे. ओमर अब्दुल्ला हे माजी मुख्यमंत्री व मेहबुबा मुफ्ती याही माजी मुख्यमंत्री आहेत. ओमर अब्दुल्ला यांच्याविरोधात आपल्या पक्षाचा उमेदवार उभा राहणार नाही, असे त्यांनी जाहीर केले आहे.

तब्बल दहा वर्षांनी जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभा निवडणूक होत आहेत. या काळात दहशतवाद संपुष्टात आलेला नसला तरी मोठ्या प्रमाणावर सुरक्षा दलाने मोडून काढला आहे. जम्मू-काश्मीरमध्ये निवडणुका कधी होणार याची तेथील जनता वाट बघत होती. ३७० वे कलम रद्द झाल्यानंतर जम्मू-काश्मीरमध्ये निवडणुका घेऊन तेथे लोकनियुक्त सरकार लवकर स्थापन व्हावे यासाठी काहींनी सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले. अखेर सर्वोच्च न्यायालयाने सरकारला मुदत घालून निवडणुका घेण्याचे आदेश दिले. भारतीय जनता पक्षाने पीडीपीबरोबर आघाडी करून या राज्यात काही काळ सत्ता उपभोगली. पण विधानसभेचे उमेदवार ठरवताना पक्षाला मोठी कसरत करावी लागली. भाजपाने जम्मू-काश्मीरसाठी ४४ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. पण असंतोष व खदखद बघून काही वेळातच ही यादी मागे घ्यावी लागली व नंतर केवळ १५ उमेदवारांची नवीन यादी जाहीर केली. त्यात आठ जण मुस्लीम आहेत. दुसऱ्या पक्षातून आलेल्या आयारामांना भाजपाने पहिल्या यादीत स्थान दिले होते, त्याला पक्षातून मोठा विरोध झाला. तसेच जे दोन माजी उपमुख्यमंत्री होते, त्यांची नावेच पहिल्या यादीत नव्हती. कार्यकर्त्यांचा रोष बघून भाजपाला नवीन यादी जाहीर करावी लागली.

लोकसभा निवडणुकीत भाजपाने ज्या चुका केल्या त्या पुन्हा होऊ नयेत असे कार्यकर्ते बजावताना दिसत आहेत. बाहेरून आलेल्या नेत्यांना पक्षाने लोकसभा निवडणुकीत उमेदवारी दिली होती, त्याची किंमत पक्षाला मोजावी लागली. उमेदवार निवडीची पारदर्शक प्रक्रिया भाजपाकडे नाही, अशी सर्वसाधारण तक्रार आहे. उमेदवारी ठरवताना सर्वच राजकीय पक्षांना कार्यकर्ते व इच्छुकांचा रोष सहन करावा लागतो आहे. जमिनीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन उमेदवार निश्चित केले पाहिजेत, अशी मागणी सर्वच पक्षांतून होत आहे. सन २०१४ मध्ये विधानसभा निवडणूक झाली होती तेव्हा राज्याला ३७० व्या कलमाचा आधार होता, राज्याला विशेष दर्जा होता. आता विशेष दर्जा नाहीच. पण जम्मू-काश्मीरचे विभाजनही झाले आहे. लडाख प्रांत वेगळा केला आहे. गेल्या वेळी निवडणुकीनंतर सरकार स्थापन करण्यासाठी भाजपा व पीडीपी एकत्र आले होते, आता दोन्ही पक्ष एकमेकांच्या विरोधात आहेत. भाजपा स्वबळावर जम्मू-काश्मीरची विधानसभा निवडणूक लढवत आहे. पण जम्मू प्रदेशात भाजपाचाच जास्त बोलबाला आहे. राज्यातील हिंदू मतदारांना भाजपा हाच पक्ष जवळचा वाटतो. नॅशनल कॉन्फरन्स, पीडीपी किंवा काँग्रेस हे तीनही पक्ष मुस्लीम व्होट बँकेची जास्त काळजी घेत असतात.

# बोगस राजपूत भामटा यांची घुसखोरी थांबवा, अन्यथा तुमचा सुपडासाफ करु:गोर सेनेचा इशारा



वडवणी: प्रतिनिधी

नुकत्याच एमबीबीएस प्रवेशप्रक्रीयेला सुरुवात झाली असून महाराष्ट्रातील विमुक्त जाती अ प्रवर्गात बोगस राजपूत भामटा ने प्रचंड घुसखोरी केली असून विमुक्त जाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांच्या तब्बल तिनशे पेक्षा अधिक जागा बोगस राजपूत भामटानी हडप केल्या आहेत यासाठी गोरबंजारा समाजातील अग्रेसर असलेल्या गोरसेना या सामाजिक संघटनेच्या वतीने आज संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हाधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत शासनाला निवेदन देऊन ही घुसखोरी थांबविण्याची विनंती केली आहे अन्यथा येणार्या निवडणूकीत विद्यमान सरकारचा सुपडासाफ करण्याचा गर्भीत इशारा गोरसेनेने दिला आहे.

सविस्तर बातमीनुसार,विमुक्त जाती अ मध्ये राजपूत भामटा या अत्यल्प लोकसंख्या असलेल्या जातीचा सामावेश असून नाम साधर्म्याचा फायदा घेत सवर्ण राजपूत, मिना,छप्परबंद या खुल्या प्रवर्गातील जनसमुदाय यांनी खुलेआम घुसखोरी करीत अभियांत्रिकी, वैद्यकीय, सह शासकीय नोकरभरतीत लाभ घेत आहे.राजपूत जातीतील लोक भामटा शब्द लावून भामटेगिरी करत असल्याने मुळ विमुक्त जाती अ प्रवर्गातील १४ तत्सम जाती आरक्षणाचे अतोनात नुकसान होत आहे म्हणून गोरसेना या संघटनेतर्फे संपूर्ण महाराष्ट्रात २०१९ पासून ठिकठिकाणी आंदोलने होत आहे. यासंदर्भात न्याय हक्क व अधिकारांसाठी गोरसेनेने राष्ट्रीय अध्यक्ष प्रा संदेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण राज्यात निवेदने दिलीत,नंतर जिल्हा स्तरावर रास्ता रोको करण्यात आले होते. मोर्चा आंदोलने गोरसेनेनी केले.तेव्हा विधीमंडळात विशेष तपासणी आयोग एस.आय.टी. नेमण्याची घोषणा दलीत बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी केली.मात्र राजकीय दबावाखाली येत त्यांनी दुसर्याच दिवशी माझ्या कडून चुकीची घोषणा झाल्याचे सांगत एस.आय.टी.लागू करणार नसल्याचे सांगितले. तेव्हा गोरसेनेच्या वतीने नागपूर हिवाळी अधिवेशनावर नागपुरात ०८ डिसेंबर रोजी २५ -३० हजार लोकांच्या जनसमुदायाला घेऊन जन आक्रोश महामोर्चा काढण्यात आले मात्र या मोर्चाचे साधे निवेदन घेण्यासाठी सुद्धा राज्य सरकारच्या एकही मंत्र्याने औचित्य दाखविले नाही. मंत्री अतुल सावे विधीमंडळातून पळ काढला अन्? मोर्चेकरीच्या नेतृत्वाला सामोरे गेले नाही. साधे निवेदन न घेतल्याने समस्त गोरबंजारा समाजाचा जाणिवपूर्वक अपमान राज्यसरकारने केलेला आहे. कालपरवा दिनकर राठोड या गोरबंजारा युवकांने पुसद येथे १४ दिवस आमरण उपोषण केले मात्र त्यांची राज्यसरकारने किंचितही दखल घेतली नाही की विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात साधी चर्चा सुद्धा केली नाही त्यामुळे गोरबंजारा समाज प्रचंड संतापलेला असून यावेळी बंजारा समाजाच्या मतावर निवडून गेलेल्या आमदारांनी समाजाचा हा जिवंत प्रश्नाकडे जाणिवपूर्वक कानाडोळा केला. बोगस राजपूत भामटा घुसखोरी च्या प्रश्नाबाबत साधे निवेदन न केलेल्या राज्य सरकारला धडा शिकवण्यासाठी गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा संदेश चव्हाण यांनी कंबर कसली असून या वेळी ६२ विधानसभा आमदारांना घरचा रस्ता दाखवण्याचा गर्भित इशारा गोरसेनेने दिले आहे. या अगोदर संपूर्ण राज्यात १८ जिल्हायात जोडे मारो आंदोलन केले होते . त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात गोरसेनेने विविध ठिकाणी रास्ता रोको आंदोलन केले होते त्यामध्ये तुळजापूर, जालना, मंठा, पुसद,दिग्रस, दारव्हा, अकोला, वाशीम, हिंगोली, नांदेड, बीड, बुलढाणा आदी ठिकाणचा सामावेश होता . बोगस राजपूत भामटा यांच्या घुसखोरीविरोधात गोरसेनेने रणसिंग फुंकलेले असून गोरसेनेचे आंदोलन हे जन आंदोलन होत आहे. तांडा, वाड्यावरुन या आंदोलनाला जनतेचे मोठे पाठबळ लाभत आहे.

विमुक्त जाति (अ) प्रवर्गात अवैध मार्गाने खोटे जात वैधता प्रमाणपत्र घेणाऱ्या लाभाथर्यासह खोटे प्रमाणपत्र वितरित करणाऱ्या अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्यासाठी विशेष तपासणी पथक ( ) लागू करण्यात यावी .

(२) संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा ठिकाणी जिल्हा जात वैधता पडताळणी समितीमध्ये वि . जा . (अ) प्रर्वगातील एका तज्ञ व्यक्तीस शासकिय प्रतिनीधी मह्णुण नेमणुक देण्यात यावी .

(३) २४ नोव्हेंबर २०१७ च्या महाराष्ट्र शासनाकडून निर्गमित झालेला रक्त नातेसंबंधाचा निकष लावून जात वैधता प्रमाणपत्र देण्याचे शासन निर्णय ( ) त्वरित रध्द करण्यात यावा .

(४ ) संपूर्ण महाराष्ट्रात खरे राजपूत जातीचे लोक प्रत्यक्षात कुठे निवासी राहतात त्या तालुका निहाय जिल्ह्याची यादी शासनामार्फत त्वरित जाहीर करण्यात यावी .

(५) राज्य मागास अहवाल क्र ४९ / २०१४ लागु करण्यात यावा. (६) महाराष्ट्र शासनाने विमुक्त भटक्या जमातींना लागू केलेली उन्नत व प्रगत गटाची अट त्वरित रद्द करण्यात

यावी .

या मागण्या मान्य न झाल्यास येत्या निवडणुकीला संपूर्ण विमुक्त जाती अ प्रवर्गातील जातीचे विशेषतः बंजारा जातीमध्ये तीव्र संताप निर्माण होऊन भविष्यात राज्यसरकारला फार मोठी किमंत चुकवावी लागणार असल्याची चर्चा आहे.

# डिजीटल मीडिया परिषदेच्या राज्यस्तरीय कार्यशाळेत सहभागी व्हा:अनिल वाघमारे





परळी : प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या सुचनेनुसार पुणे येथे येत्या २० सप्टेंबर २०२४ रोजी होत असलेल्या अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद संलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेच्या राज्यस्तरीय

कार्यशाळे बाबत जिल्ह्यातील डिजिटल मीडिया परिषदेच्या पदाधिकारी व सदस्यांची बैठक परळी वैजनाथ येथील व्हीआयपी विश्रामगृह संपन्न झाली. या बैठकीत डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष अनिल वाघमारे यांनी राज्यस्तरीय कार्यशाळे संदर्भात माहिती देत आपण आपल्या हितासाठी व यु ट्यूब चॅनल, पोर्टल च्या यशस्वी वाटचाली साठी ही राज्यस्तरीय कार्यशाळा किती महत्त्वाची आहे याची माहिती देण्याबरोबरच आपण व आपल्या सहकार्या सोबत सहभागी होऊन आपलं हित साध्य करावे असे आवाहन केले.

याबाबत अधिक वृत्त असे की, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद संलग्न डिजिटल मीडिया परिषदेची राज्यभरातील डिजिटल मीडिया मध्ये जसे युट्युब, ब्लोगर, डिजिटल न्यूज पोर्टल, डिजिटल प्लॅटफॉर्म इत्यादी डिजिटल माध्यमातून काम करणाऱ्या सर्व पत्रकारांसाठी एक दिवशीय कार्यशाळा पिंपरी चिंचवड पुणे येथे येत्या २० सप्टेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आली आहे. परळी येथे झालेल्या बीड जिल्हा आढावा बैठकीला बीड जिल्ह्यातील परळी,अंबाजोगाई, आष्टी, बीड, गेवराई, वडवणी आदी तालुक्यातील डिजिटल मीडिया परिषदेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. यावेळी डिजिटल मीडिया परिषदेच्या अनुषंगाने आजच्या डिजिटल युगात आपल्या यु ट्यूब व पोर्टल च्या माध्यमात काम करताना सर्वांनी संघटनात्मक दृष्ट्या एकत्र असणं किती आवश्यक आहे याची माहिती देण्याबरोबरच पुण्यात होणाऱ्या डिजिटल मिडिया परिषदेच्या राज्यस्तरीय कार्यशाळेची सखोल माहिती डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष अनिल वाघमारे यांनी दिली. त्याचबरोबर डिजिटल मिडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र सिरसाठ, कार्याध्यक्ष दिनकर शिंदे, उपाध्यक्ष संग्राम धन्वे, उपाध्यक्ष विश्वंभर मुळे,उपाध्यक्ष सय्यद बबलू यांनी देखील सर्वांनी कार्यशाळेत सहभागी होण्याचे आवाहन केले. दरम्यान या आढावा बैठकीनंतर अधिकाधिक संख्येने पुण्यात होणाऱ्या या कार्यशाळेला आम्ही परळीतून ही मोठ्या संख्येने उपस्थित राहु असा विश्वास धनंजय आरबुने व तालुका अध्यक्ष नितीन ढाकणे यांनी व्यक्त केला. सदर आढावा बैठक यशस्वी करण्यासाठी परळी तालुका अध्यक्ष नितीन ढाकणे मराठी पत्रकार परिषद समन्वयक धनंजय आरबुने, अमोल सूर्यवंशी पत्रकार भगवान साकसमुद्रे आदींनी परिश्रम घेतले.

# वैद्यकीय प्रमाणपत्र घरोघरी जाऊन देण्यात यावे:कोरडे

माजलगावः प्रतिनिधी

मुख्यमंत्री वयोश्री योजना चालू केल्याबद्दल मा.मुख्यमंत्री एकनाथजी शिंदेसाहेब व या योजने संबंधी सर्व संयोजक, नियोजक खूप खूप अभिनंदन. परंतु वयोवृद्ध व्यक्तींचे वय ६५ वर्षे असल्याकारणाने त्यांना ''वैद्यकीय प्रमाणपत्रा' 'साठी वैद्यकीय अधिकारी किंवा सरकारी दवाखाना कार्यालय पर्यंत जाता येत नाही.त्यासाठी त्यांना खूप त्रास, कष्ट किंवा जाण्यासाठी कोणतेही साधन, सुविधा नसल्यामुळे या योजनेपासून बरेच लाभार्थी वंचित राहू शकतात.वय वर्ष वयोवर्षी पुढील व्यक्ती कोणत्या नाकोणत्या तरी आजाराने, व्याधीने त्रासलेले असतात. तरीदेखील माननीय मुख्यमंत्री व समाज कल्याण मंत्रालय व सर्व संबंधित विभाग यांनी या योजनेसाठी ''वैद्यकीय प्रमाणपत्र'' हे प्रत्येक गावात जाऊन वयोवृद्ध व्यक्तींच्या दारी जाऊन देण्यात यावी.वयोवृद्ध व्यक्तींना गावाकडून येण्या जाण्यासाठी मुबलक प्रमाणात साधन नसल्या कारणाने वयोश्री योजना संबंधित सर्व विभागाने वैद्यकीय प्रमाणपत्र हे प्रत्येक व्यक्तींच्या लाभार्थी यांच्या घरी जाऊन सार्वजनिक ठिकाणी, ग्रामपंचायत,समाज मंदिरे अशा ठिकाणी बोलवून देण्यात यावी.तसेच(डॉक्टर आपल्या दारी ही योजना)चालू केल्यामुळे वयोवृद्ध व्यक्तींचे होणारे हेळसांड बंद होईल.तसेच वयोवृद्ध व्यक्तीला आर्थिक उत्पन्नाचे कोणते साधन नसल्याने डॉक्टर आपल्या दारी ही योजना चालू केल्यामुळे त्यांना त्यांचा आर्थिक होणारा खर्च देखील होणार नाही.वरील विषयातील मागणीची शासन दरबारी संबंधित प्रशासनाने लवकरात लवकर पाठपुरावा करून वैद्यकीय डॉक्टरांना आदेश देण्यात यावे.डॉक्टर आपल्या दारी या योजनेतून मुख्यमंत्री वयोश्री वैद्यकीय प्रमाणपत्र देण्यात यावी.ही मागणी या निवेदनाद्वारे सरकारकडे करण्यात आलेले आहे. तसेच मुख्यमंत्री वयोश्री योजनेसाठी लागणारे वैद्यकीय प्रमाणपत्रामुळे कोणत्याही वयोवृद्ध व्यक्ती,लाभार्थी वंचित राहणार नाही याची सर्वस्व जबाबदारी संबंधित सर्व प्रशासनाची राहिल.या निवेदनाद्वारे सदरील मागणी प्रशासनाकडे केली आहे.

# धुनकवाड येथे अखंड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी पारायण व भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा

## पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा:शिवहारी शंकर यादव







वडवणी :प्रतिनिधी

धारुर तालुक्यातील धुनकवाड येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी पारायण व भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.या सोहळ्याचा आरंभ दि.१२ सप्टेंबर २०२४ गुरुवार रोजी तर सांगता दि.१८सप्टेंबर २०२४बुधवार रोजी होणार आहे.

तरी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने भाविक-भक्तांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक शिवहारी शंकर यादव, नवनाथ शिवहारी यादव, सोमनाथ शिवहरी यादव यांनी केले आहे.

डोंगरपट्यात धुनकवाड ह्या गावची ओळख धार्मिक क्षेत्रात अग्रेसर असणारे गाव म्हणून असून या सप्ताहाचा भार दरवर्षी एकाच व्यक्तीवर असतो यापुढील दहा वर्ष येथे सप्ताहाचे यजमान बुक झाले आहेत. वै.ह.भ.प दत्ता महाराज पिंपळनेरकर, ह.भ. प.,वै.जनार्दन(आण्णा)यादव,वै.ह.भ.प.

रघुनाथ महाराज यादव,वै. गुरुवर्य गंगाधर शास्त्री मुळे,वै. राजेंद्र जाधव यांच्या प्रेरणेने गेल्या४२ वर्षापासून धुनकवाड येथे भव्य अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा श्रीमद्? भागवत कथा ज्ञान यज्ञ सोहळ्याचे आयोजन केले जात आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताह व किर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाची रूपरेषा पहाटे ते६ काकडा, ६ ते७ विष्णुसहस्त्रनाम व गीता १५वा अध्याय, ७ ते११ ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा,११ ते १२:३० गाथा भजन, १ ते ५ ह.भ.प गुरुवर्य वसंत महाराज पिंपळनेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमद भागवत कथा प्रवक्ते ह.भ.प पांडुरंग महाराज पिंपळनेर यांचे भागवत कथा,५ते६ हरिपाठ, संध्या.६ ते८ भोजन,९ ते ११हरिकीर्तन व नंतर सामुदायिक जागर होईल.

दि.१२सप्टेंबर २०२४ गुरुवार रोजी ह.भ.प. महंत आप्पासाहेब महाराज चौरे, चोंडी यांचे कीर्तन,दि.१३सप्टेंबर शुक्रवार रोजी विनोदाचार्य ह.भ.प.शिवदास महाराज जंगले, मोठेवाडी.दि.१४ सप्टेंबर शनिवार रोजी भागवताचार्य ह.भ.प. समाधान महाराज शर्मा,केज.दि.१५ सप्टेंबर रविवार रोजी विनोदाचार्य ह.भ.प.प्रकाश महाराज साठे, सोनिमोहा.दि.१६ सप्टेंबर सोमवार रोजी ह.भ.प महादेव महाराज राऊत,म्हासापुर जवळा., दि.१७ सप्टेंबर मंगळवार रोजी वैराग्यमुर्ती ह.भ.प. रामकृष्ण बापु रंधवे,पाटोदा.,दि.१८ सप्टेंबर बुधवार रोजी किर्तनसिंधू ह.भ.प.सागर महाराज बोराटे सर, नातेपुते यांचे सकाळी ११ते १या वेळेत सुश्राव्य वाणीतून काल्याचे किर्तन होईल व नंतर महाप्रसाद होईल.

तरी या भागवत सप्ताह कीर्तन महोत्सव तथा ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व श्रीमद्? भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यास पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक शिवहारी शंकर यादव,नवनाथ शिवहारी यादव, सोमनाथ शिवहारी यादव व समस्त गावकरी मंडळी धुनकवाड यांनी केले आहे.

# तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई द्या:विलास साळवे

माजलगाव:प्रतिनिधी

गेल्या तीन-चार दिवसापासून बीड जिल्ह्यात जोरदार अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे.

या पिकांचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी केसापुरीचे माजी सरपंच विलासराव साळवे यांनी केली आहे.

बऱ्याच वर्षानंतर यावर्षी वेळेवर पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांनी महागाई बियाणे खते घेऊन वेळेवर पेरणी केली आहे.

वेळेवर पाऊस पडल्यामुळे शेतकऱ्यांची सोयाबीन कापूस तुर ऊस आदी पिके ही जोरात आली आहेत.परंतु गेल्या तीन चार दिवसापासून बीड जिल्ह्यात धुवाधार अतिवृष्टी झाल्यामुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या तोंडी आलेला घास या निसर्गाने हिरावून नेला आहे.शेतकऱ्यांचे प्रचंड पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे.शासनाने तात्काळ शेतकऱ्यांच्या नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना या पिकांची नुकसान भरपाई म्हणून तात्काळ आर्थिक मदत करावी, अशी मागणी केसापुरीचे माजी सरपंच विलासराव साळवे यांनी केले आहे.

## टी.सी.हरवला आहे

सुप्रीया गिण्यानदेव राठोड या नावाचा इयत्ता इ १२ वी पास मुळ टी सी वडवणी ते बीड बस प्रवासात हरवला आहे.

सापडल्यास खालील मोबाईल नंबर वर संपर्क साधावा..

मो.नंबर :९८२३६१८७०५

साप्ताहिक
# डोंगरचा राजा
बुधवार, दि. ११ सप्टेंबर २०२४ । पान ३




Mo:9923300876
7020546764
महेंद्र एस.उजगरे
विमा प्रतिनिधी
दि न्यु इंडिया इन्शोरन्स कं.लि.
शाखा : परळी वै.
सिरसाळा, ता.परळी वैजनाथ, जि.बीड.

# भीमनगरमध्ये बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ वाचनास उदंड प्रतिसाद



वडवणी : प्रतिनिधी

संपूर्ण देशामध्ये भारतीय बौद्ध महासभा यांच्या वतीने वर्षावासाचे कार्यक्रम सुरू आहेत.पावसाळ्याच्या दिवसांमध्ये तथागत भगवान गौतम बुद्धाने ,एकाच ठिकाणी बसून बौद्ध धर्माचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी भिक्खू ना मार्गदर्शन केले. हे भिखु तथागतांचे प्रवचन तीन महिन्याच्या काळामध्ये काळजीपूर्वक ऐकत होते.आपल्या हृदयामध्ये आणि बुद्धीमध्ये त्याची साठवणूक करीत होते. हे भिखू तीन महिन्याच्या नंतर चारही दिसेलां तथागतांच्या आदेशाप्रमाणे धम्माचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी गावोगावी फिरत होते.त्यामुळे बौद्ध तत्त्वज्ञानाला आणि बौद्ध धम्माला प्रचंड प्रमाणामध्ये गती प्राप्त झाली होती.. संपूर्ण भारत बौद्धमय तथागताने केलेला होता. सर्व जनता आनंदामध्ये आणि समाधानाने जीवन जगत होती.अशा या बौद्ध धम्माच तत्त्वज्ञान महामानव बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी आत्मसात केले.आणि १४ ऑक्टोबर १९५६ भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून बौद्ध धम्माची दीक्षा घेतली.बौद्ध धम्माची दीक्षा घेताना बाबासाहेब आंबेडकरांची व्यापक अशा पद्धतीची संकल्पना होती.परंतु दीक्षा घेतल्यानंतर अवघ्या काही महिन्यांमध्येच महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण झाले.आणि बौद्ध धम्म प्रचार आणि प्रसाराला फार मोठी खीळ बसली.परंतु त्यांचे सुपुत्र भैयासाहेब आंबेडकर यांनी, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे महान कार्य हाती घेतलं.चैत्यभूमीची निर्मिती केली. बौद्धाचार्यांची निर्मिती केली.आणि संपूर्ण भारतभर बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार फार मोठ्या प्रमाणात करायला सुरुवात केली.कालांतराने सूर्यपुत्र भैयासाहेब आंबेडकर यांचे निर्माण झालं. पुन्हा एकदा धम्माची गती कमी होते की काय असे वाटू लागले.परंतु डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या सुनबाई, ममता सागर महाउपासिका मीराताई आंबेडकर ,यांनी बौद्ध धम्माची प्रचार व प्रसार करण्याची धुरा आपल्या खांद्यावर घेऊन भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून संपूर्ण भारतभर बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार करायला सुरुवात केले.अडीच हजार वर्षांपूर्वी जसे पावसाळ्यामध्ये तथागत भगवान गौतम बुद्ध एकाच ठिकाणी बसून, भिकू संघाला मार्गदर्शन करायचे , मार्गदर्शित झालेला भिकू संघ हा दाही दिशेला बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार करायचा ..त्याचीच पुनरावृत्ती भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून आणि मीराताई आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली ,भारतीय बौद्ध महासभेचे कार्याध्यक्ष भीमराव यशवंत आंबेडकर यांच्या मार्गदर्शनानुसार, संपूर्ण भारत देशामध्ये आषाढी पौर्णिमा ते अश्विनी पौर्णिमा या तीन महिन्याच्या कालखंडामध्ये संपूर्ण भारत देशामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर लिखित, बुद्ध आणि त्यांचा धम्म,ग्रंथ वाचन सुरू आहे.. प्रत्येक गावात, खेड्यापाड्यात ,गल्लोगल्लीत, तालुक्यात, जिल्ह्यात, राष्ट्रात, फार मोठ्या प्रमाणामध्ये बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ, वाचायला सुरुवात झालेली आहे.त्याचाच एक भाग म्हणून मौजे भीम नगर तालुका वडवणी जिल्हा बीड या ठिकाणी बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ सतत वाचून असंख्य लोकांना बुद्ध तत्त्वज्ञानाकडे वळवण्याचं काम भीम नगर मधील भारतीय बौद्ध महा सभेच्या कार्यकर्त्या त्या उत्साहाने करीत आहेत.. भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष आयुष्यमान प्रकाश तुळशीराम खळगे सर यांनी संपूर्ण तालुक्यामध्ये बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ वाचण्यासाठी तालुक्यातील अनेक गावांना भेटी देऊन प्रत्येक गावागावांमध्ये ग्रंथ वाचण्यासाठी लोकांना प्रभावित केले आहे. तसेच भारतीय बौद्ध महासभेच्या तालुका उपाध्यक्षा सौ शीलाताई सुखदेव उजगरे ,संस्कार उपाध्यक्ष श्रीमती अग्नी अण्णाभाऊ खळगे, यांच्या सहकार्याने प्रत्येक तालुक्यातील गावांमध्ये ग्रंथाचे वाचन उत्साहामध्ये सुरू आहे. मौजे भीम नगर या ठिकाणी या ग्रंथ बाचनास फार मोठ्या प्रमाणामध्ये प्रतिसाद मिळत आहे.. अनेक मुला-मुलींना चांगल्या पद्धतीचे वळण लागले आहे. बौद्ध तत्त्वज्ञानाकडे त्यांचा कल वाढत आहे.. म्हणून वडवणी तालुक्यातील भीम नगर,, तसेच नागवंशी बुद्ध विहार , मौजे पिंपरखेड,, कवडगाव,, देवडी,, खळवट लिमगाव ,,देवळा,,या ठिकाणी,, बौद्धमय वातावरण झाले आहे,, भारतीय बौद्ध महासभेच्या सर्व कार्यकर्त्या या निमित्त सहभागी होतात.. त्यामध्ये वृंदावनी उजगरे ,सागरबाई उजगरे, कलावती बाई उजगरे, सीताबाई जाधव, अनुसयाबाई उजगरे शोभाताई उजगरे, राहीबाई उजगरे, ई. भारतीय बौद्ध महासभेच्या महिला परिश्रम घेतात आणि परिसरातील असंख्य बौद्ध उपासक उपासिका या ग्रंथ श्रवण करण्यास उपस्थित असतात.

त्यामुळे वडवणी परिसरातील भीम नगर आणि नागवंशी बुद्ध विहार,तसेच खेड्या पाड्यातील चैतन्याचे वातावरण निर्माण झालेलं आहे.संपूर्ण तालुक्यामध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.



# भीमराव हत्तीअंबीरे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

बीडःप्रतिनिधी

नुकताच राष्ट्रवादी भवन बीड येथे समाजभूषण भीमराव हत्तीअंबीरे (उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार तथा प्रभारी,सामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र प्रदेश नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार) यांच्या प्रमुख उपस्थित व जिल्हाध्यक्ष आमदार संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली पक्ष प्रवेश सोहळा संपन्न झाला.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष पद्मविभूषण खासदार शरदचंद्र पवार साहेब यांच्या विचाराने प्रेरित होऊन अनेक कार्यकर्ते पक्षात प्रवेश करीत आहेत. हे खरे असले तरी हत्तीअंबीरे यांच्या निवडीमुळे आंबेडकरी चळवळीतील हजारो कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करण्याचा झंझावात सुरू झाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा फुले शाहू आंबेडकर यांच्या विचाराला मानणारा पक्ष आहे.शरदचंद्र पवार यांनी सत्तेचा विचार न करता डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव तत्कालीन औरंगाबाद व आत्ताचे छत्रपती संभाजी नगर विद्यापीठाला नाव देणारा महाराष्ट्रातील एकमेव धर्मनिरपेक्ष नेता शरदचंद्र पवार साहेब आहेत तसेच सर्वसामान्य माणसाला न्याय देणारा पक्ष आहे असे ग्वाही समाजभूषण भीमराव हत्तीअंबीरे यांनी बीड येथे पक्ष प्रवेश सोहळ्याच्या निमित्ताने बोलताना दिली. ७५ वर्ष झाले भारत देशाला स्वातंत्र्य होऊन मात्र बहुजन समाजातील अनेक घटक सत्ते पासून वंचित आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की राजकीय सत्ता हस्तगत करायची असेल तर आघाड्यांचं राजकारण केले पाहिजे परंतु या देशात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने लोकांना भावनिक ब्लॅक मेल करायचे आणि जातीवादी पक्षाशी समझोता करायचा व स्वतःची राजकीय पोळी भाजून घ्यायची अशा पध्दतीने बहुजन समाजाला गुमराह करायचे आणि स्वतंत्र निवडणुका लढायच्या याचा फायदा जातीवादी पक्षाला करुन द्यायचा आता माझा बहुजन समाज असल्या भूलथापांना बळी पडणार नाही. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला मातीत गाढण्यासाठी महाविकास आघाडी ला जास्तीत जास्त आपले मत देवून आपण सत्तेत सहभागी व्हायचे आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन ब्लॅक मेल करणाऱ्यांना आत्ता आपण ब्लॉक करावे असे आवाहन समाजभूषण भीमराव हत्तीअंबीरे यांनी बोलताना केले आहे.

यावेळी आंबेडकरी चळवळीतील रिपाई,वंचित बहुजन आघाडी,व जेष्ठ विचारवंत,नेते यांच्या सह अनेक कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश केला त्यापैकी महत्वाचे जेष्ठ नेत्यांच्या नावाचा उल्लेख आवश्यक आहे ते बीड येथील आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ नेते ॲड सिध्दार्थ शिंदे,ॲड सुधीर माने,गेवराई येथील विजय वाव्हळ, आदिसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# मुख्यमंत्री शिंदेंना मागासवर्गीय विकास योजनांचा पडला विसरःॲड.उजगरे

वडवणी : प्रतिनिधी

महाराष्ट्रातील आंबेडकरी जनतेला माहीत आहेत. कारण,राष्ट्रवादी काँग्रेस,शिवसेना महाविकास आघाडीचे सरकार गेले व नवीन सरकार स्थापन झाले. एकनाथजी शिंदे मुख्यमंत्री झाले. सामाजिक न्याय विभाग हे खाते मुख्यमंत्री यांनी आपलेकडे ठेवले. माझे माहितीप्रमाणे हे पहिल्यांदा घडले की सामाजिक न्याय खात्याचे मंत्री, मुख्यमंत्री झाले. आम्हाला वाटले आता सामाजिक न्यायाचे काम होईल. परंतु, हा विभाग दुर्लक्षित राहिला.

मुख्यमंत्री विसरले असतील की त्यांचाकडे सामाजिक न्याय विभागाची महत्वाची जबाबदारी आहे. मुख्यमंत्री यांचेकडे विभाग असेल तर त्या विभागात प्रचंड हालचल व गुणात्मक बदल दिसला पाहिजे. जसे चालले तसे चालत असेल तर मुख्यमंत्री यांचेकडे विभाग असून काय उपयोग? अनुसूचित जाती जमातीच्या विकासासाठी बजेट कायदा करण्यासाठी काहीच प्रयत्न झाल्याचे दिसत नाही. वार्षिक बजेट मध्ये , च्या लोकसंख्येचे प्रमाणात / बजेटमध्ये निधीची तरतूद करण्यात आली नाही. मागील दहा वर्षात जवळपास ४० हजार कोटींचा निधी नाकारला गेला. नवीन सरकारच्या काळात ही पूर्ण निधी मिळाला नाही. ही बाब लक्षात आणून दिल्यानंतर ही त्याबाबत काही कारवाही नाही. अट्रोसिटी ॲक्ट १९८९ व सुधारित २०१५, सुधारित नियमावली २०१६ च्या नियम १६ नुसार राज्यस्तरीय दक्षता व देखरेख समिती फार उशिरा गठीत तर केली. परंतु बैठक घेऊन जातीय अत्याचाराच्या घटना राखण्यासाठी उपाययोजना केल्या नाहीत. २०१८ मध्ये शेवटी बैठक झाली होती, त्यांनतर आतापर्यंत झाली नाही. मुख्यमंत्री हे या राज्य समितीचे अध्यक्ष आहेत. सामाजिक न्याय विभागाचे मंत्री सुद्धा आहेत. तरीपण



बैठक न होणे म्हणजे दुर्लक्ष व उदासीनता म्हणता येईल.भूमिहीनांना ४ एकर कोरडवाहू जमीन देण्याची आर्थिक विकासाची स्वाभिमान योजना आजही व्हेंटिलेटरवर आहे. ही महत्त्वाची योजना प्रभावी व प्रवाही करण्यासाठी प्रयत्न झाल्याचे दिसत नाही. वर्ष २०२२ मध्ये आम्ही सुमंत भांगे सामाजिक न्याय मुख्य सचिव यांचे विरुद्ध जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे तीव्र निषेध व निदर्शने आंदोलन केले होते, त्यामध्ये प्रमूख मागणी बार्टीचे सर्व केंद्रांना आर्थिक साहाय्य देणे,जातीवादी सुमंत भांगे यांची सचिव पदावरुन हाकाल पट्टी करावी, शिक्षणासाठीच्या, शिष्यवृत्ती, फी माफी, नामवंत शैक्षणिक संस्थेत शिक्षण,परदेशी शिक्षण, डॉ बाबासाहेब आंबेडकर स्वलंबन स्वाधार योजनेचे बजेट तात्काळ वाटप करावे,सामाजिक न्याय व वित्त सहाय्यक विभागाचा निधी इतरत्र वळवू नये, रमाई घरकुल योजना २००८ पासूनची आहे. १५-१६ वर्ष झालीत. फलश्रुती काय? ह्याचा अभ्यास झाला नाही. हॉस्टेलमध्ये सेवा-सुविधात सुधारणा करणे गरजेचे असताना, १२ वर्ष होऊन ही कोणतीही सुधारणा झाली नाही. स्वाधार योजनेचे तसेच. वर उल्लेखित योजना व विषय यामध्ये नवीन काय झाले? सामाजिक न्याय विभागाला पूर्ण निधी का मिळाला नाही व मिळालेला निधी पूर्णपणे खर्च का झाला नाही? अखर्चित निधीचे काय झाले? बजेटचा कायदा का होत नाही? अट्रोसिटीची राज्यस्तरीय बैठक का होत नाही? योजनांची प्रभावी अंमलबजावणी का नाही? मुख्यमंत्री यांनी जनतेला सांगावे.असे ॲड भास्कर उजगरे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे म्हटले आहे.

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

फाईल क्र. :-

प्रकरण : महाराष्ट्र शासन गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २०२१ अन्वये अर्जदाराचे नाव : श्री १. कोंडराम दत्तात्रय गुरसाळी, २. वच्छलाबाई दत्तात्रय गुरसाळी पत्ता रा.वडवणी, ता.वडवणी, जि.बीड

सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, सर्व्हे/गट नं. ६६० प्लॉट नं. .. वार्ड क्रः .... घर (मिळकत) क्र. ११८४ साईज पु.प.२५ फुट, द.ऊ. ४० फूट वर अर्जदार चे भुखंड/प्लॉट नियमीत करण्याकरिता अर्ज केलेला आहे.

वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील भुखंड/प्लॉट नियमीत करण्यासाठी अर्ज केला आहे. कोणास अक्षेप किंवा हरकत असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत कार्यालयात अक्षेप अर्ज दाखल करावा. मुदतीनंतर आलेल्या अक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.

चंतुःसिमा :पुर्वः अन्सार कुरेशी, पश्चिमः सुमनबाई डोंगरे, दक्षिणः रस्ता १० फुट, उत्तरः दत्ता टकले

दिनांक : १०/०९/२०२४

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**





## ३० खाटांची उपलब्धता करु..

माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे नेते मोहनराव जगताप यांनी नुकतीच वडवणी जवळील सोन्नाखोटा येथील शिव शंभो वारकरी शिक्षण संस्थेला भेट दिली. याठिकाणी शिक्षण घेणारी मुले जमिनीवर झोपत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांनी तातडीने ३० खाटांची उपलब्धता करून देण्याचा शब्द दिला. यावेळी वारकरी शिक्षण संस्थेचे संचालक महादेव महाराज खोटे ज्ञानेश्वर महाराज खोटे सह आदी मान्यवर उपस्थित होते.



वडवणी तहसील कार्यालयात नव्याने पुरवठा विभागाला नायब तहसीलदार म्हणून पौर्णिमा नैताम यांनी पदभार स्वीकारल्यानंतर त्यांचा सत्कार करताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खलील पठाण, अँड.भास्कर उजगरे, शहादेव लोंढे, सुरेश सावंत यांनी यथोचित सत्कार करुन शुभेच्छा दिल्या.

# रिपाइंच्या तालुकास्तरीय बैठकीस उपस्थित रहावे:उजगरे

वडवणीःप्रतिनिधी

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने बीड शहरात केंद्रीय मंत्री नामदार रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत (दि.५) ऑक्टोबर रोजी घेण्यात येणाऱ्या भव्य सत्कार सोहळ्याच्या पूर्व तयारीसाठी रिपाइंच्यावतीने युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या



प्रमुख उपस्थितीत वडवणी येथे येत्या १३ सप्टेंबर रोजी दुपारी ४ वाजता तालुकास्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी वडवणी तालुक्यातील तमाम कार्यकर्त्यांनी या महत्वपूर्ण बैठकीस उपस्थित रहावे असे आवाहन रिपाईचे तालुका अध्यक्ष महादेव उजगरे यांनी केले आहे.

# आ.प्रकाश सोळंके यांचा सर्व पक्षीय समितीच्या वतीने भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन

माजलगाव :प्रतिनिधी

राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखा यांच्या वतीने महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मु यांच्या हस्ते माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश सोळंके यांना उत्कृष्ट भाषणाबद्दल पुरस्कार देण्यात आला आहे. त्यानिमित्त माजलगाव मतदार संघातील सर्वपक्षीय नागरिकांच्या वतीने भव्य असा सत्कार सोहळा करण्याचे आयोजिले आहे. त्यासाठी काल मंगळवारी दिनांक १० सप्टेंबर रोजी माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात सर्व पक्ष व संघटनांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत या नागरी सत्कार समारंभा निमित्त सर्वपक्षीय सत्कार समितीचे गठन करण्यात आले. या समितीचे अध्यक्ष म्हणून व्यापारी महासंघाचे तालुकाध्यक्ष सुरेंद्र रेदासणी यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. तसेच सत्कार समितीचे सचिव म्हणून अच्युत लाटे, मनोहर डाके, उमेश मोगरेकर, सहसचिव पदी रवींद्र कानडे, उमेश जेथलिया, नवनाथ धाईजे, कोषाध्यक्षपदी सुनील रुद्रवार, मार्गदर्शक म्हणून जयदत्त नरवडे, श्रीहरी मोरे व संभाजी शेजुळ यांची निवड करण्यात आली. तर दयानंद स्वामी, अरुण राऊत, मुसदिक बाबा, नारायण होके, तुकाराम येवले, कुणाल दुगड, अभय होके, राजेश घोडे, नासेरखान पठाण, महावीर मस्के, डॉ.वसीम मनसबदार, अॅड.अमित नाटकर, पप्पू धरपडे आदि उपस्थित होते.

**जाहीर प्रगटन**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१०/०९/२०२४

सर्व जनतेस याव्दारे कळविण्यात येते की, १) श्रीमती. गोदावरी दशरथ डिगे यांनी मोहल्ला गट नं. मचील प्लॉट नं. मधील प्लॉट घर क्रमांक. ४८८ त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जानुसार जागेची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पूर्वः- भुजबळ, पश्चिमः- रस्ता, दक्षिणः- लिहुन देणार क्र.०१ व ०२ यांची उर्वरीत जागा, उत्तरः- दगडू कुरकुटे

आकारः पुर्व पश्चिम ४४ फुट. व दक्षिणोत्तर- २७.५ फुट. एकुण क्षेत्रफळ

वरील नामांतराबाबतच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.

मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**मुख्याधिकारी ,नगरपंचायत, वडवणी**

**जाहीर प्रगटन**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१०/०९/२०२४

सर्व जनतेस याव्दारे कळविण्यात येते की, श्री. रेखा राजेंद्र शिंदे, संदीपान श्रीरंग मुजमुले यांनी मोहल्ला गट नं.५२६ मधील प्लॉट नं. १६ मधील प्लॉट घर क्रमांक ७७१३ त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वः- ०९ मीटर रस्ता, पश्चिमः-प्लॉट नं.१५

दक्षिणः-लुंकड यांची प्लॉटींग, उत्तरः- ०९ मीटर रस्ता

आकारः पुर्व पश्चिम ७.६० मी. व दक्षिणोत्तर- ११.५० मी. एकुण क्षेत्रफळ ८७.०४ चौ.फु.

वरील नामांतराबाबतच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.

मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**मुख्याधिकारी ,नगरपंचायत, वडवणी**

**जाहीर प्रगटन**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१०/०९/२०२४

सर्व जनतेस याव्दारे कळविण्यात येते की, १) कटाळू दौलत सय्यद २) आखील दौलत सव्यद यांनी मोहल्ला गट नं. मधील प्लॉट नं. मधील प्लांटाघर क्रमांक. २६९९ त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पूर्वः- पि.टी.आर प्रमाणे, पश्चिमः- पि.टी. आर. प्रमाणे

दक्षिणः- पि.टी. आर. प्रमाण, उत्तरः-पि.टी.आर.प्रमाण

आकारः पूर्व पश्चिम २५ फुट व दक्षिणोत्तर- ४० फुट एकुण क्षेत्रफळ १००० चौ.फु., वरील नामांतराबाबतच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे

मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल,

**मुख्याधिकारी ,नगरपंचायत, वडवणी**

**जाहीर प्रगटन**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१०/०९/२०२४

सर्व जनतेस याव्दारे कळविण्यात येते की, १) श्री. मिराबाई बाळु नागरगोजे यांनी मोहल्ला सि.टी.सर्व्हे/ गट नं.५२९ प्लॉट नं.६७, ६८ मिळकत क्र.२७८२,२७८३ मधील असा असुन त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतुः सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वः-९ मीटर रस्ता, पश्चिमः-प्लॉट नं. ६० व ६१, दक्षिणः- प्लॉट नं. ६६, उत्तरः-, प्लॉट नं. ६९

आकार :-१) पुर्वपश्चिम ०९ मी व दक्षिणोत्तर ०९ मी एकूण क्षे.५४ चौ.मी. पूर्वपश्चिम ०९ मी व दक्षिणोत्तर ०९ मी एकूण क्षे.५४ चौ.मी.

२) वरील नामांतराबाबतच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**मुख्याधिकारी ,नगरपंचायत, वडवणी**

साप्ताहिक
# डोंगरचा राजा
बुधवार, दि. ११ सप्टेंबर २०२४ । पान ४

# नुकसानीचा अग्रीम पिक विमा मिळावा

## कृषी मंत्री धनंजय मुंडेंच्या पिक विमा कंपनीस कडक सुचना



बीड : प्रतिनिधी

मागील काही दिवसात झालेल्या सततच्या पावसाच्या पाण्यामुळे पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून तातडीने त्याचे सॅम्पल सर्व्हे विमा कंपनी व कृषी विभागाने संयुक्तरित्या ८ दिवसात पूर्ण करुन त्यापुढील १५ दिवसात शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा अग्रीम पिक विमा मिळावा, असे निर्देश कृषी मंत्री तथा जिल्हयाचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी आज बैठकीत दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज श्री मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतेच झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. याबैठकीस आ.बाळासाहेब आजबे, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी पाटील, रा कॉ चे जिल्हाध्यक्ष ऍड.राजेश्वर चव्हाण , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा कृषी अधिक्षक बाबासाहेब जेजुरकर, आत्माचे प्रक्लप संचालक सुभाष साळवे यांच्यासह विमा कंपनीचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी पिक विमा कंपण्यांचे प्रतिनिधींना पुढील आठवडयाभरात कृषी विभागाच्या सहकार्याने नमुना सर्वेक्षण करून त्याच्या पुढील १५ दिवसात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पिक विमाचा लाभ मिळाण्याबाबत सुचना केल्या. नमुना सर्वेक्षण करताना कुठलेही चुक अथवा दुर्लक्ष विमा कंपण्यांकडून झाली असल्यास अशा कर्मचाऱ्यांवर थेट गुन्हे दाखल केले करावेत असेही निर्देश पालक मंत्री यांनी यावेळी दिले.

बीड जिल्ह्यात अतिवृष्टी झालेल्या सर्व महसूल मंडळातील नुकसानीच्या भरपाईचे नैसर्गिक आपत्ती अनुदान मागणीचे अहवाल राज्य शासनास तात्काळ सादर करावेत, असेही निर्देश धनंजय मुंडे यांनी जिल्हा प्रशासनास दिले आहेत.

### मुख्यमंत्री माझी लाडकी बहीणीचा घेतला आढावा

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण यां योजनेचा आढावा पालक मंत्री श्री मुंडे यांनी घेतला असून जिल्हयातील एकूण ६ लाख ४१ हजार १४७ महिलांचे अर्ज प्राप्त झालेले आहेत. यापैकी ६ लाख १६ हजार ७८८ महिलांचे अर्ज मंजुर झालेले असल्याची माहिती जिल्हाधिकारी श्री. पाठक यांनी श्री. मुंडे यांना दिली. १२ हजार ६११ अर्जांवर मंजुरी देण्याची प्रक्रिया सुरू असून ११ हजार ७४८ अर्ज विविध कारणांनी प्रलंबित असल्याचे जिल्हाधिकारी यांनी पालक मंत्री यांना सांगितले, उर्वरीत अर्जांवरील समस्या लवकर दूर करून त्यांनाही मंजुरी देण्याचे निर्देश पालक मंत्री श्री. मुंडे यांनी यावेळी केल्या.



# वडवणी तालुका अतिवृष्टी नुकसान समावेशापासुन वंचित ठेऊ नये : विनायक मुळे

वडवणी:प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील झालेल्या आतिव्रष्टीमुळे शेतकर्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाले असुन शासनाने सरसकट बीड जिल्ह्य़ातील अहवालामध्ये वडवणी तालुका वगळला आहे, तरी शासनाने संबधित अधिकार्यांना तात्काळ आदेश देवुन अतिवृष्टी अहवालामध्ये वडवणी तालुका समावेश करुन घ्यावा. तसेच शेतकर्यांना पिक विमासाठी लावलेली ईपीक पाहणी अट रद्द करुन सरसकट पिक विमा देण्यात यावा, वडवणी तालुक्यामध्ये अनेक शेतकर्यांच्या पशुधनाचे भरपुर प्रमाणात हानी झाली असुन त्यांना मदत करावी या सह वडवणी तालुक्यातील ज्या शेतकऱ्यांनी ऑनलाइन फवार्यासाठि अर्ज केले आहेत त्यांना तात्काळ फवारे वाटप करण्यात यावेत या व इतर मागण्यांचे निवेदन तहसील कार्यालय, क्रषी कार्यालय वडवणी यांना शिवसेना संपर्क नेते सुनिल प्रभू, शिवसेना उपनेत्या सुषमाताई अंधारे, संपर्क प्रमुख परशुराम जाधव, शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते , विधानसभा प्रमुख महादेव आंबेकर यांच्या आदेशानुसार व शिवसेना तालुकाप्रमुख विनायक मुळे यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले. यावेळी युवराज शिंदे, श्रीराम झाटे, उध्दव काकडे, अशोक गोंडे, महादेव सातपुते, सरपंच संजय धपाटे, मुन्ना पवार, नेताजी डांबे, सारंग रडे,गणेश मेह्त्रे, युवासेनेचे नवनाथ मोरे, अजय खांडवे, अविनाश बोंद्रे, राजेश गिलबिले, संजय पडघम, कल्याण शेंडगे, प्रकाश राठोड, दादासाहेब मस्के, भैय्या खोसे, रतन सवासे , प्रकाश राठोड या सह शिवसैनिक,शिवसेना पदाधिकारी,शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजलगाव मतदार संघात वाजणार तुतारी ;प्रा.ईश्वर मुंडे लयभारी



माजलगाव :प्रतिनिधी

महाराष्ट्र विधान सभेच्या निवडणूका दारावर येऊन ठेपल्या आहेत.तशी सर्व पक्षांची व संभाव्य उमेदवारांची लगबग वाढलेली दिसत आहे.सर्व पक्ष,संभाव्य उमेदवार व माध्यम समुह विविध उमेदवारांचा सर्वे करत आहेत.माजलगाव मतदार संघाचा एका खाजगी सर्वे एजंन्सी चा सर्वे समोर आला आहे.

या सर्वे मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाने महा विकास आघाडीत ओबीसी उमेदवार प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांना आपली उमेदवारी दिली तर ते सर्वाधिक मतांनी निवडून येतील असा जनमताचा कौल आलेला आहे.त्यांना ३६.६१ टक्के मतदारांची पसंती आहे.

जर महायुती ने माधव निर्मळ यांना उमेदवारी दिली तर ते द्वितीय क्रमांकावर राहतील.त्यांना २१.१९ टक्के मतदारांची पसंती आहे.माजलगाव मतदार संघात मनोज जरांगे पाटील यांनी दिलेला उमेदवार तृतीय स्थानावर राहील.त्यांना १९.१५ टक्के मतदारांची पसंती आहे. जर महा युतीने बाबरी मुंडे यांना उमेदवारी दिली तर ते चौथ्या क्रमांकावर राहतील.त्यांना ८.९८ मतदारांची पसंती आहे.महा युतीत अजीत पवार राष्ट्रवादी ने जर जयसिंग सोळंके यांना उमेदवारी दिली तर ते पाचव्या स्थानावर राहतील.त्यांना ६.७८ टक्के मतदारांची पसंती आहे.

महा युतीत भाजप ने रमेश आडसकर यांना उमेदवारी दिली तर ते सहाव्या क्रमांकावर राहतील.त्यांना ५.५९ टक्के मतदारांनी पसंती दिली आहे.महायुतीत भाजप ने जर मोहन जगताप यांना उमेदवारी दिली तर ते सातव्या स्थानावर राहतील.त्यांना १.६९ टक्के मतदारांनी पसंती दिली आहे.

एकंदर माजलगाव मतदार संघात बदल घडून तुतारी वाजेल व महा विकास आघाडीने सोशल इंजिनीअरिंग करून प्रा.ईश्वर मुंडे यांचा उच्च शिक्षीत ओबीसी व नवीन चेहरा निवडणूकीत उतरवला तर ते सगळ्यांना भारी पडतील असा अंदाज सर्वे मधून समोर आला आहे.

# देवडी येथे काळविटाचा बिबट्याने पाडला फडशा

वडवणी:प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील देवडी येथे एका शेतकऱ्याच्या उसाच्या शेतामध्ये बिबट्याने काळवीटाची शिकार करुन अर्धवट खाल्लेले काळवीटाचे शरीर दिसून आल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वनविभागाने तात्काळ पिंजरा बसवण्याची मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

तालुक्यातील देवडी येथील शेतकरी रामप्रसाद बाबुराव आगे यांच्या शेतातील गट नंबर ७७ मध्ये उसाच्या शेतात अर्धवट खाल्लेले काळवीटाचे शरीर शेतकऱ्याला दिसून आले.काळवीटाच्या अवतीभवती बिबट्या सदृश्य ठसे दिसून आले.याची कल्पना धारूर वन विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आली.वन विभागाचे अधिकारी दुर्घटनाग्रस्त शेतात गेले असता.

त्या ठशांची पाहणी केली.अर्धवट खाल्लेल्या काळवीटाची पाहणी केली असता.या काळवीटाची शिकार बिबट्याने केली असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.त्यामुळे नागरिकांमध्ये व शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.वन विभागाने तात्काळ पिंजरा आणून बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी शेतकऱ्यांमधून केली जात आहे.तर

या वेळी वन विभागाचे अधिकारी संभाजी पारवे ,एस आर मात्रे, एल ए गंगावने,यांच्यासह परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

# ग्रामीण बँकेच्या वडवणी शाखेचे नविन जागेत स्थलांतर

## ग्राहकांच्या सहकार्यावरच यशस्वी वाटचाल:वानखेडे

वडवणी प्रतिनिधी

वडवणी शहर व कार्यक्षेत्रातील दत्तक गावातील ग्राहकांच्या सहकार्यामुळेच महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा वडवणी ही यशस्वीपणे वाटचाल करत आहे व आगामी काळातही असेच मोलाचे सहकार्य करावे असे आवाहन महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे क्षेत्रीय व्यवस्थापक यशवंत वानखेडे यांनी केले

वडवणी येथील ग्रामीण बँकेचे येथील पोलिस स्टेशनच्या बाजुस असणाऱ्या बादशहा काम्पलेक्स येथे स्थलांतर झाले या निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते या कार्यक्रमास उपक्षेत्रीय व्यवस्थापक सानप , वसुली अधिकारी भराटे उपस्थित होते उपरोक्त मान्यवरांच्या हस्ते सर्वप्रथम दिपप्रज्वलन व प्रतिमापुजन करण्यात आले तदनंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार परमेश्वर मायकर प्रणय पाटील व सौ.किरण वाकळे-गिरगे मॅडम यांचे हस्ते सत्कार करण्यात आला

आपल्या प्रास्ताविक पर भाषणात शाखा व्यवस्थापक मायकर म्हणाले कि वडवणी तील ग्राहक व शेतकरी सुज्ञ व सुसंस्कृत असल्याने मी व सहकारी मित्रांनी केलेल्या पिक कर्ज नुतनीकरण कामात आम्हाला यश प्राप्त होऊन आम्ही जिल्ह्यात ८५% नुतनीकरण करून पहिला क्रमांक पटकावला आहे यात ग्राहक यांचाच सिंहांचा वाटा आहे या कामी आम्हाला लाभलेले क्षेत्रीय व्यवस्थापक वानखेडे यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले आहे अशा या कामगिरीमुळे माझी जन्मभूमी हीच कर्मभूमी ठरत आहे आगामी काळात ही असेच सहकार्य लाभले तर मी आणखी काम करून शाखा जिल्हा स्तरावर कायम नंबर एकवर ठेवील


या कार्यक्रमास व्यापारी आंडील दत्ता गार्डी सदरेकाका मनोज बारटक्के तसेच बाजार समितीचे कर्मचारी हस्ते आंधळे चव्हाण गणेश कोळपे तसेच डिजिटल मिडिया परिषदेचे राज्याध्यक्ष तथा डोंगरचा राजांचे संपादक अनिल वाघमारे मराठी पत्रकार परिषद वडवणी चे अध्यक्ष विनायकराव जाधव सचिव सतिश सोनवणे प्रजापत्रचे ता.प्रतिनिधी बाबुराव जेधे एम डि एल न्युज चॅनल चे संपादक ओमप्रकाश साबळे दै.झुंजारनेताचे ता.प्रतिनिधी ज्ञानेश्वर वाव्हळ सुधाकर पोटभरे महिला पत्रकार गितांजली वानखेडे महेश सदरे यांचेसह अनेक मान्यवर उपस्थित होते उपस्थित मान्यवरांचा बँकेच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बँकेतील अधिकारी प्रणय पाटील, सौ.योगिता जाधव, सौ.किरण वाकळे, अजित पाटील, कर्मचारी गोरक्ष पंधारे, विशाल कसबे ,बैंकमित्र शांतिनाथ जैन, पुरुषोत्तम गिलबिले, प्रदिप निपटे ,महादेव सरक, सुरेश साबळे आदींनी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शांतिनाथ जैन यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रणय पाटील यांनी केले.










हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, **संपादक वाघमारे अनिल श्रीराम** यांनी प्रगती ऑफसेट, पंचशिलनगर, वडवणी, ता.वडवणी जि.बीड - ४३११४४ येथे छापून साप्ताहिक डोंगरचा राजा कार्यालय, मेन रोड, वडवणी, ता.वडवणी, जि.बीड ४३११४४ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले आहे. मो. ९४२२५९१८०५, फॅक्स : ०२४४३-२५७७८८, **निवासी संपादक : डॉ.एल.बी. वाघमारे** (*या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. वाद वडवणी न्यायालय अंतर्गत)